# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांक: 17.03.2024** **वार: रविवार**

---

**ठळक बातम्या,**

1. **देशात लोकसभा निवडणूक सात टप्प्यांमध्ये होणार, चार जूनला मतमोजणी.**
2. **एकंदर 97 कोटी मतदारांपैकी 1 कोटी 82 लाख नवे मतदार.**
3. **नव भारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत आज देशातल्या 23 राज्यांमध्ये पायाभूत साक्षरता आणि संख्यात्मक मूल्यमापन चाचणीचं आयोजन.**
4. **या देशव्यापी मूल्यांकनासाठी अंदाजे 37 लाख विद्यार्थ्यांचा सहभाग**
5. **समुद्री चाच्यांनी अपहरण केलेल्या मालवाहू जहाजातील 17 जणांची भारतीय नौदलाकडून सुटका.**
6. **इंग्लंड बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत भारताचा लक्ष्य सेन इंडोनेशियाच्या जोनाटन क्रिस्टीकडून पराभूत.**

**आणि**

7. **चौदाव्या हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत बंगालचा तेलंगणावर विजय.**

**लोकसभा**

देशातील आगामी लोकसभा निवडणुका 19 एप्रिलपासून सात टप्प्यांमध्ये होणार आहेत. मतमोजणी 4 जून रोजी हाती घेण्यात येईल असं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत जाहीर केलं. यासोबतच संपूर्ण देशभरात आदर्श आचार संहिता लागू झाली आहे.

देशामध्ये 97 कोटी नोंदणीकृत मतदार असून 1 कोटी 82 लाख मतदार प्रथमच मतदान करणार आहेत. वर्तमान लोकसभेचा कार्यकाळ यावर्षी 16 जून रोजी संपत आहे. सिक्कीम, ओडिशा, आंध्र प्रदेश आणि अरुणाचल प्रदेश विधानसभा निवडणुकांची घोषणाही यावेळी करण्यात आली. लोकसभा निवडणुकीचा 102 जागांसाठीचा पहिला टप्पा 19 एप्रिल ला, 89 जागांसाठी होणारा दुसरा टप्पा 26 एप्रिल तर 94 जागांवर लढला जाणारा तिसरा टप्पा 7 मे रोजी पार पडेल. 96 जागांसाठी चौथ्या टप्प्याचं मतदान 13 मे, 49 मतदार संघांसाठी पाचव्या टप्प्याचं मतदान 20 मे, 57 जागांसाठीचा सहावा टप्पा 25 मे तर 57 लोकसभा मतदार संघासाठीचा सातवा आणि शेवटचा टप्पा 1 जूनला होणार आहे.

महाराष्ट्रात पाच टप्प्यात मतदान होणार आहे. पहिला टप्प्यात १९ एप्रिल ला रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर, आणि चंद्रपूर इथं मतदान होणार असून, दुसऱ्या टप्प्यात २६

एप्रिलला बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड, आणि परभणी इथं मतदान होईल.
तिसऱ्या टप्प्यात ७ मे रोजी रायगड, बारामती, धाराशीव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर, आणि हातकणंगले इथं मतदान होणार असून, चौथा टप्प्यात १३ मे रोजी नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर, शिर्डी, आणि बीड इथं मतदान होईल.
पाचव्या टप्प्यात २० मे रोजी धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, आणि मुंबईतल्या सहा मतदारसंघात मतदान होणार आहे. राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये आचार संहिता लागू झाली असून निवडणूक यंत्रणा सज्ज करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले असल्याचं आमच्या बातमीदारांनी कळवलं आहे.
लोकसभा निवडणुकीकरीता महाराष्ट्रामध्ये प्रत्येक उमेदवाराला खर्चाची मर्यादा 95 लाख रुपये ठेवण्यात आली आहे. राज्यात 15 मार्चअखेर एकंदर 9 कोटी 20 लाख 70 मतदार नोंदणीकृत आहेत. निरंतर मतदार नोंदणीचा कार्यक्रम सुरु आहे. मतदार नोंदणी झालेली नाही, अशा पात्र नागरिकांकडून संबंधित टप्प्यातील उमेदवारांचे उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिनांकाच्या 10 दिवस आधीपर्यंत प्राप्त झालेले अर्ज क्रमांक 6 मतदार यादीमध्ये नोंद घेण्यासाठी विचारात घेण्यात येतील असं राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रधान सचिव एस. चोक्कलिंगम यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत सांगितलं.

**नव भारत साक्षरता**

नव भारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत आज देशातल्या 23 राज्यांमध्ये पायाभूत साक्षरता आणि संख्यात्मक मूल्यमापन चाचणीचं आयोजन करण्यात आलं आहे. या देशव्यापी मूल्यांकनासाठी अंदाजे 37 लाख विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत,असं केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं सांगितलं आहे.या मूल्यांकनामध्ये वाचन,लेखन आणि संख्या अशा तीन विषयांचा समावेश असून प्रत्येकाला 50 गुण म्हणजेच एकूण दीडशे गुण आहेत.बहुभाषिकतेला प्रोत्साहन देणाऱ्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने ही चाचणी विद्यार्थ्यांच्या प्रादेशिक भाषांमध्ये घेतली जाणार आहे. अध्यापन शिक्षण सत्रांच्या प्रभावाचं मूल्यांकन करण्यासाठी ही चाचणी महत्त्वपूर्ण असून पात्रता प्राप्त विद्यार्थ्यांना मूलभूत साक्षरता आणि संख्यात्मक कौशल्ये आत्मसात करण्यात त्यांची कामगिरी ओळखून नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओपन स्कूलिंगद्वारे जारी केलेले प्रमाणपत्र प्राप्त होईल.

**प्रसारभारती अध्यक्ष**

माजी सनदी अधिकारी नवनीत कुमार सहगल यांनी काल प्रसारभारतीचे नवे अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारला. सेहगल हे 1988 च्या तुकडीचे उत्तरप्रदेश केडरचे निवृत्त अधिकार आहेत. ए सूर्यप्रकाश यांच्याकडून ते पदभार स्वीकारतील. पदभार स्वीकारल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सहगल म्हणाले की, दूरदर्शन आणि आकाशवाणी मोठ्या प्रमाणात जनमानसात पोहोचले असून

माहितीचे विश्वसनीय स्रोत आहेत. सार्वजनिक प्रसारक या नात्याने सामान्य जनतेपर्यंत निःपक्षपाती बातम्या पोहोचवणे हे प्रसार भारतीचे कर्तव्य असल्याचंही सहगल यांनी म्हटलं आहे.

**पंतप्रधान**

संपूर्ण जग अनिश्चिततेच्या भोवऱ्यात अडकलेलं असतानाही भारताचा विकास वेगानं होत राहील, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं.ते काल दिल्लीतल्या इंडिया टुडे परिषदेत बोलत होते. देशातल्या नोंदणीकृत स्टार्टअपची संख्या 2014 पूर्वी फक्त एक हजाराच्या आत होती,तर आज ही संख्या सुमारे 1 लाख 25 हजारांच्या घरात आहे. ज्या खेडेगावातील स्त्रियांनी कधी सायकलही चालवली नसेल त्या आता ड्रोन पायलट बनत आहेत,असंही पंतप्रधान यावेळी म्हणाले.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण विविध भारतीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.**

**भारतीय नौदल**

समुद्री चाच्यांनी अपहरण केलेल्या एमव्ही रुएन या मालवाहू जहाजातील 17 जणांची भारतीय नौदलानं सुटका केली आणि सर्व 35 समुद्री चाच्यांना पकडलं. भारतीय नौदलाने सांगितले की,भारतीय नौदलाच्या आयएनएस कोलकातानं भारतीय किनाऱ्यापासून जवळजवळ 2600 किमी अंतरावर असलेलं समुद्री चाच्यांचं जहाज अडवलं आणि त्यातून बेकायदेशीर शस्त्रास्त्रे, दारूगोळा जप्त केला. 40 तासांपासून अधिक काळ चाललेल्या या कारवाईत भारतीय युद्धनौका आयएनएस सुभद्रा,हाय अल्टिट्यूड लाँग एन्ड्युरन्स ड्रोन, सागरी गस्ती विमान आणि मार्कोस प्रहार यांनी सहभाग घेतला. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये येमेनी बेट सोकोत्राजवळ या मालवाहू जहाजाचं अपहरण करण्यात आलं होतं. दरम्यान एका दशकाहून अधिक काळ सोमाली समुद्री चाच्यांनी महत्त्वाच्या जागतिक जलमार्गांमध्ये अशांतता निर्माण केली असून एक डिसेंबरपासून भारतीय नौदलानं अपहरण, अपहरणाचा प्रयत्न आणि संशयास्पद अशा किमान सतरा घटनांची नोंद केली आहे.

**हैदराबाद**

हैदराबादचे नागरिक मतदार ओळखपत्र नोंदणी आणि दुरुस्तीसाठी नामांकनाच्या शेवटच्या दिवसाच्या 10 दिवस आधी म्हणजेच 14 एप्रिलपर्यंत नावनोंदणी करू शकतात तसंच शेवटच्या तारखेनंतरही लोक अर्ज करू शकतात परंतु असे अर्ज 2024 लोकसभा निवडणुकीच्या मतदार यादीत समाविष्ट केले जाणार नाही, असं हैदराबादचे जिल्हा निवडणूक अधिकारी रोनाल्ड रोझ यांनी सांगितलं आहे.या वर्षी फेब्रुवारीच्या निवडणुकीच्या अंतिम यादीनुसार हैदराबाद जिल्ह्यात 45 लाख 70 हजाराहून हून अधिक मतदार आहेत. त्यापैकी 23 लाख 30 हजार पुरुष आणि 22 लाख 39 हजार महिला मतदार आहेत. तर 324 तृतीयपंथी मतदारांचीही मतदार यादीत नोंद आहे.

**रिझर्व्ह बँक गव्हर्नर**

कृत्रिम बुद्धिमता तंत्रज्ञानामुळंसायबर सुरक्षा आव्हानं अनेक पटींनी वाढू शकतात, त्यामुळं वित्तीय संस्थांनी ग्राहकांच्या माहितीचं संरक्षण करण्यासाठी भरीव प्रयत्न करावेत,असं आवाहन भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी केलं आहे. ते काल आरबीआय लोकपालच्या वार्षिक परिषदेत'ग्राहक केंद्रीतता आणि ग्राहक संरक्षण' या विषयावर बोलत होते.वित्तीय व्यवस्थेचे संरक्षक या नात्यानं आरबीआयचं यश केवळ प्रणालीच्या लवचिकतेला चालना देण्यावर अवलंबून नाही, तर आर्थिक परिसंस्थेचा गाभा असलेल्या देशाच्या नागरिकांच्या जीवनात आम्ही आणलेल्या मूल्यावरही अवलंबून आहे, असं सांगत आर्थिक परिसंस्थेचे भागधारक या नात्यानं ग्राहकांना वाजवी शाश्वत उत्पादनं आणि सेवा प्रदान करणं आवश्यक आहे,असं शक्तिकांत दास यांनी यावेळी नमूद केलं.

**विमानतळ**

15 आणि 16 मार्च दरम्यान विमानतळ आयुक्तालयाच्या मुंबई सीमा शुल्क विभागानं केलेल्या कारवाईत पाच वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये 1 एक कोटी 46 लाख रुपयांचं सोनं आणि विविध इलेक्ट्रॉनिक वस्तू जप्त केल्या.या पाच पैकी एका प्रकरणात, इथिओपियाची राजधानी आदिस अबाबा ते मुंबई असा प्रवास करणाऱ्या एका परदेशी नागरिकाकडून त्याच्या पिशवीत सोनं लपवून ठेवलेलं आढळून आलं. तर दुसऱ्या प्रकरणात, सिंगापूर ते मुंबई प्रवास करत असलेल्या भारतीय नागरिकाकडून त्यानं परिधान केलेल्या अंतर्वस्त्रामध्ये सोन्याचे कण लपवून ठेवल्याचं आढळून आलं.

**बॅडमिंटन**

इंग्लंड बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत भारताच्या लक्ष्य सेनला इंडोनेशियाच्या जोनाटन क्रिस्टीकडून 12-21, 21-10, 15-21 असा पराभव पत्करावा लागला.तत्पूर्वी, इंडोनेशियाच्या अँथनी गिंटिंगनं बर्मिंगहॅममध्ये काल अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. गिंटिंगनं फ्रान्सच्या क्रिस्टो पोपोव्हचा 19-21, 21-5, 21-11 असा पराभव केला. गिंटिंगचा सामना आता इंडोनेशियाच्याच जोनाटन क्रिस्टीशी होणार आहे. 1994 नंतर पहिल्यांदाच इंग्लंड बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेची अंतिम फेरी इंडोनेशियाच्या खेळाडूंमध्ये होणार आहे.

**हॉकी**

पुण्यातल्या मेजर ध्यानचंद हॉकी मैदानावर सुरू असलेल्या चौदाव्या हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात बंगालनं तेलंगणा संघाचा 11-0 असा धुव्वा उडवत उपांत्यपूर्व फेरीत स्थान पटकावलं. दुसऱ्या सामन्यात आंध्र संघावर उत्तर प्रदेश संघानं मात करून त्यांचं आव्हान संपुष्टात आणलं. आतापर्यंत मध्य प्रदेश, झारखंड, महाराष्ट्र आणि बंगालनं उपांत्यपूर्व फेरीत स्थान निश्चित केलं आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**